थोडक्यात

इच्छापूर्ती गणेश पाद्यपूजन सोहळा

नाशिक । संकष्टी चतुर्थीच्या दिवशी श्री इच्छापूर्ती गणेशाचा पाद्य पूजन सोहळा पंचमुखी हनुमान मंदिराचे अध्यक्ष स्वामी महंत भक्तीचरणदास महाराज यांच्या हस्ते करण्यात आला. त्रिमूर्तीनगर कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अंबादास खैरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. सोहळ्यास मंडळाचे अध्यक्ष सागर तांबे, कार्याध्यक्ष मयूर गोसावी, सागर पूरकर, संदीप गांगुर्डे, अमोल आव्हाड, नागेश चव्हाण, भास्कर सोनवणे, मनोहर आव्हाड, विजय घुगे, संदीप खैरे, अशोक पाटील आदींसह पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहित्यवाटप

नाशिक । नाशिक जिल्हा घरकाम मोलकरीण संघटना, आयटक घरकाम मोलकरीण संघटना नाशिक शहर आणि सुशील सीताराम ट्रस्ट यांच्या संयुक्त सहकार्याने ७० घरकामगारांच्या मुलांना वह्यावाटप करण्यात आले. कार्यक्रमास सावाना विश्वस्त प्रा. सोमनाथ मुठाळ आणि डॉ. अजय कापडणीस प्रमुख पाहुणे होते. आयटकचे राज्य सचिव राजू देसले यांनी मनोगत व्यक्त केले. संघटना अध्यक्षा मीना आढाव यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन प्राजक्ता कापडणे यांनी केले. आभार प्राजक्ता मगर यांनी मानले. कार्यक्रमास मीनाक्षी डोंगरे, संध्या साबळे, रेखा गायकवाड आणि इतर कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

पथदीप बंद

जुने नाशिक । येथील प्रभाग १४ मधील बागवानपुरा येथील बडी मस्जिदच्या जवळ असलेला पोल मागील अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहे. त्यामुळे या परिसरातील रहिवाशांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा साम ना करावा लागत आहे. शाळकरी मुले, वयोवृद्ध आणि महिलांसाठी हा मार्ग अत्यावश्यक आहे. तरी हा पोल तात्काळ दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

लॅब सुरू

सातपूर । जागतिक कौशल्य दिनानिमित्त स्वातंत्र्यवीर सावरकर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख यांच्या हस्ते सिमेन्स मॅन्युफॅक्चरिंग टेक्नॉलॉजी लॅबचे लोकार्पण झाले. यावेळी विभागाच्या वतीने प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक अनिल गावित, संस्थेचे उपसंचालक रवींद्र मुंडासे, सिमेन्सचे प्लांटहेड दीपक कुलकर्णी, प्रोजेक्ट मॅनेजर मंदार नातू उपस्थित होते.

पूर्व विभाग हेल्पलाईन

जुने नाशिक। नाशिक मनपा पूर्व विभागात नागरिकांच्या तक्रारींसाठी संपर्क क्रमांक देण्यात आले आहे. पूर्व विभागातील नागरिकांना लाईट, गटार चोकअप, रस्त्यांची डागडुजी किंवा इतर नागरी समस्यांबाबत आता थेट संपर्क करून तक्रार नोंदवता येणार आहे. ०२५३-२५०४२३३ या क्रमांकावर कॉल करून नागरिक तक्रार करु शकता.

नदी संवर्धनासाठी लोकसहभाग महत्त्वाचा

जिल्हाधिकारी जलज शर्मा यांचे प्रतिपादन

नाशिक । प्रतिनिधी

'चला जाणूया नदीला' या उपक्रमात समाविष्ट नद्यांसह सर्वच नद्यांच्या संवर्धनासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. सिंहस्थाआधी गोदावरी नदी स्वच्छतेला अधिक प्राधान्य देण्यात येईल. यात लोकसहभागदेखील महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात गुरुवारी (दि. १७) 'चला जाणूया नदीला' या उपक्रमाबाबत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सहायक जिल्हाधिकारी ओमकार पवार, नाशिक पश्चिम भागाचे उपवनसंरक्षक तथा 'चला जाणूया नदीला' समितीचे सदस्य सचिव सिद्धेश सावर्डेकर, त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी डॉ. श्रीया देवचक्के, सामाजिक कार्यकर्ते राजेश पंडित, अंबरिश मोरे आदी उपस्थित होते.

उपक्रमाच्या माध्यमातून नद्यांचे संरक्षण आणि संवर्धन याबरोबरच जलसंधारण आणि जलसाक्षरता या दोन्ही संकल्पना एकत्रित केल्या आहेत. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नद्यांच्या संवर्धनाला प्राधान्य देण्यात येईल. तसेच जिल्हा प्रशासनातर्फे नदी संवर्धनासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितले.

जिल्ह्यात संवाद यात्रा

जिल्ह्यातील मोती, म्हाळुंगी, वाल, नंदिनी, अगस्ती, कपिला, वरुणा या नदी काठावर नदी संवाद यात्रा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्याचे नियोजन सुरू असल्याचे उपवनसंरक्षक सावर्डेकर यांनी सांगितले.

घाटरस्ता सुरक्षिततेसाठी सतरा कोटींचा निधी

नाशिक । प्रतिनिधी

पावसाळ्याच्या काळात नाशिक जिल्ह्यातील घाट परिसरात वारंवार होणाऱ्या दरड कोसळण्याच्या घटनांमुळे नागरिकांच्या जीवितास आणि वाहतुकीस धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर आपत्कालीन व्यवस्थापनाच्या दृष्टीने घाट रस्त्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनस्तरावरून १७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील सप्तशृंगीगड, पिंपळगाव येथील भटाटा उतार आणि सुरगाणा तालुक्यातील घाट रस्ते हे परिसर पावसात अत्यंत धोकादायक ठरतात. या ठिकाणी वारंवार दरड कोसळणे, वाहतूक विस्कळीत होणे किंवा अपघात होण्याचे प्रकार घडत असतात. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने शासनाकडे उपाययोजनांसाठी निधीची मागणी केली होती.

सप्तशृंगीगड घाटासाठी विशेष सुरक्षा उपाय

सप्तशृंगीगड घाटातील ठराविक संवेदनशील भागांमध्ये दरड कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन आयआयटी पवईच्या तज्ज्ञ टीममार्फत जिओलॉजिकल सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यांच्या शिफारसीनुसार, संबंधित भागात लोखंडी संरक्षक जाळ्यांच्या सहाय्याने दरड दुर्घटना रोखण्यासाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या योजनेमुळे घाटात दरड कोसळण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे.

सुरगाणा घाट अन् भटाटा उतारासाठी स्वतंत्र निधी

सुरगाणा परिसरातील घाट रस्त्यांसाठी दोन कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या रस्त्यांवरील धोकादायक वळणे आणि दरडी रोखण्यासाठी उपाययोजना राबवली जाणार आहे.

पिंपळगाव येथील 'भटाटा उतार' हा उतार अत्यंत तीव्र असून तेथे वारंवार अपघात होतात. या उताराला सुलभ आणि सुरक्षित बनवण्यासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या सर्व प्रकल्पांसाठी लवकरच टेंडर प्रक्रिया सुरू होणार असून प्रशासकीय मंजुरीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष विकासकामांना गती येणार आहे. जिल्हा प्रशासनाने सांगितले की, आगामी पावसाळ्यापूर्वी या कामांची शक्य तितकी अंमलबजावणी होईल, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

या उपाययोजनांमुळे नाशिक जिल्ह्यातील घाट परिसरातील प्रवास अधिक सुरक्षित होण्याची शक्यता असून, भविष्यातील आपत्तीजनक घटनांना आळा बसेल. तसेच, सप्तशृंगीगड व इतर धार्मिक-पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या मार्गांची सुरक्षितता ही भाविकांच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची बाब ठरणार आहे.

सहकारी पतसंस्था फेडरेशनची मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा

नाशिकरोड । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या सूचनेवरून आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या शिखर समितीची महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत विविध सहकारी उपक्रमांच्या अंमलबजावणीसंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने अध्यक्ष काका कोयटे यांनी फेडरेशनच्या उपक्रमांची सविस्तर माहिती सादर केली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाची सुरुवात होताच शिर्डी येथे आयोजित आंतरराष्ट्रीय सहकार परिषद, महाराष्ट्रभर सहकार दिंडीचे आयोजन, तसेच पुढील काही महिन्यांत अहमदपूर येथील सहकार मंत्र्यांच्या गावापासून ते नागपूर (मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान) या मार्गावर सहकार ध्वज संचलन यात्रा आयोजित करण्याची महत्त्वाकांक्षी योजना याबाबत त्यांनी तपशीलवार माहिती दिली. याशिवाय, बुलढाणा येथे पतसंस्थांच्या अधिकारी, पदाधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याची घोषणा करण्यात आली.

या सर्व उपक्रमांचे मुख्यमंत्र्यांनी स्वागत करत सहकार चळवळीच्या नव्या पर्वाची ही सुरुवात असून, राज्यातील सहकारी पतसंस्था आता आंतरराष्ट्रीय सहकार विचारांचे प्रतिनिधित्व करत असल्याचे संकेत या बैठकीतून मिळाले असल्याचे मत राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे स्वागत करताना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनची सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली असल्याचे गौरवोद्गारदेखील फडणवीस यांनी काढले.

बैठकीस सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, सहकार आयुक्त दीपक तावरे, महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे आणि विविध वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मनपा पदभरतीसाठी शासनाकडे प्रस्ताव

नाशिक । महापालिकेने राज्य शासनाकडे याआधी ६७१ पदांची भरती करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता, मात्र परवानगी मिळाली नाही. आता पुन्हा एकदा तो प्रस्ताव शासनाला पाठवण्यात आला आहे. पण तो केव्हा मंजूर होईल, याची निश्चितता नाही.

नाशिक महापालिकेत तब्बल १,८२५ पदे रिक्त असून, त्यामुळे शहरातील नागरी सेवा ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा यांसारख्या अत्यावश्यक सेवांमध्ये मनुष्यबळाचा प्रचंड तुटवडा जाणवतोय. त्यामुळे नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे २०२१ पासूनच ही भरती प्रक्रिया रखडली आहे. त्यातच दिवसेंदिवस शहर वाढत असून सेवांचा बोजा कर्मचारी नसल्यामुळे अधिकच वाढतो आहे. विविध विभागांत काम करणारे सध्याचे कर्मचारी तणावाखाली आहेत.

देवळाली टीडीआर गैरव्यवहार प्रकरण चौकशी अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे

महापालिकेचे कोट्यवधींचे नुकसान स्पष्ट

नाशिक । प्रतिनिधी

देवळाली शिवारातील कथित टीडीआर (हस्तांतरणीय विकास हक्क) गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी प्रक्रिया पूर्ण झाली असून, या प्रकरणाचा सविस्तर चौकशी अहवाल गुरुवारी (दि.१७) सायंकाळी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे सादर करण्यात आला. प्राथमिक निष्कर्षानुसार, या प्रकरणामुळे महानगरपालिकेला कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे चौकशी समितीने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणात चौकशीच्या प्रारंभी चार जणांना नोटिसा बजावून खुलासा मागवण्यात आला होता. संबंधितांनी अंतिम मुदतीच्या आत आपली भूमिका लेखी स्वरूपात सादर केली होती. त्यांच्या म्हणण्याचा सखोल अभ्यास करण्यात आला असून, उपजिल्हाधिकारी भारदे यांच्या नेतृत्वाखाली अहवाल तयार करण्यात आला आहे.

प्रत्यक्षात देवळाली येथील एक भूखंड जो उद्यान, शाळा आणि १८ मीटर रुंदीच्या डीपी रस्त्यासाठी आरक्षित होता त्यासाठी टीडीआर प्रमाणपत्रातून चुकीच्या दराने मोबदला दिल्याचा आरोप करण्यात आला होता. शासकीय नियमानुसार ज्या जागेचा मोबदला ६,५०० रुपये प्रति चौ. मीटर असायला हवा होता, त्या भूखंडासाठी २५,१०० रुपये प्रति चौ. मीटर दराने टीडीआर मंजूर करण्यात आला. यामुळे शासन व महापालिकेला कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा निष्कर्ष अहवालातून समोर आला आहे.

या प्रकरणाची तक्रार विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर २६ जून रोजी संयुक्त बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत सभापतींनी महापालिका आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक नियंत्रक आणि जिल्हाधिकारी यांना १५ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर चौकशी समितीने तपशीलवार चौकशी केली आणि संबंधितांची बाजू ऐकून अंतिम अहवाल तयार केला. हा अहवाल आता जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर झाला असून, तो लवकरच शासनाकडे पाठवण्यात येणार आहे. या अहवालाच्या आधारे शासन पातळीवर निर्णय घेण्यात येणार असून, दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते, हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे.

नासाका परिसरातील जागेचा भाडेपट्टा करण्याची मागणी

नाशिकरोड । प्रतिनिधी

नाशिक साखर कारखाना परिसरातील जागा सिंहस्थासाठी वापरणार असेल तर त्याआधी पळसे ग्रामपंचायतीसोबत भाडेपट्टा करार करण्यात यावा, अशी मागणी करणारे निवेदन अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे यांच्याकडे देण्यात आले.

आगामी सिंहस्थासाठी शासनाने वापरण्याचा प्रस्ताव ठेवला असून, या पार्श्वभूमीवर पळसे ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी महत्त्वाची मागणी केली आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, नाशिक साखर कारखान्याची (नासाका) ही जमीन जिल्हा बँकेकडे ताबेगहाण आहे, मात्र तिच्या वापराबाबत गावकऱ्यांना विश्वासात घेतले जावे, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे. नासाका ही जमीन त्यांच्या गावच्या हद्दीत असून, ती कोणत्याही सार्वजनिक उपक्रमासाठी वापरली जाणार असल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हक्कांचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे. सिंहस्थ हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील धार्मिक उत्सव असला तरी त्यासाठी स्थानिक जनतेच्या भावना आणि हक्क यांचा आदर राखणे शासनाची जबाबदारी असल्याचेही ग्रामस्थांनी यावेळी चर्चेत स्पष्ट केले. यासंदर्भात पळसे गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सर्वपक्षीय पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी अप्पर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, तहसीलदार शोभा पुजारी आणि जिल्हा बँक प्रशासन यांना निवेदन देत मागणी केली आहे.

सुरगाणा उपजिल्हा रुग्णालयासाठी जमीन मंजूर

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथे लवकरच उपजिल्हा रुग्णालय उभे राहणार असून शासनाने त्याकरता पाच एकर जमीन विनामूल्य देण्यास मंजुरी दिली आहे. यामुळे स्थानिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. सुरगाणा ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी रुग्णालयासाठी जमीन मागितली होती. नाशिकचे जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांनी शासनाकडे प्रस्ताव पाठवला होता. ही जमीन फक्त रुग्णालय बांधण्यासाठीच वापरता येईल. महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियमअंतर्गत ही जमीन देण्यात आली आहे. जमिनीची विक्री, भाडे किंवा हस्तांतरण करता येणार नाही. तीन वर्षांत बांधकाम सुरू करावे लागेल. रुग्णालयाकडे जाणारा रस्ता १२ मीटर रुंद असावा. तर बांधकामासाठी नियोजन प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागेल. अटींचा भंग झाल्यास शासन जमीन परत घेऊ शकते. या रुग्णालयामुळे सुरगाणा आणि आसपासच्या गावांतील लोकांना जवळच चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील. त्यांना उपचारांसाठी दूर जावे लागणार नाही.

प्राचार्य डॉ. शहाणे यांना राष्ट्रीय पुरस्कार

नाशिकरोड । येथील बिटको महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. कृष्णा शंकर शहाणे यांना राष्ट्रीय साहित्यभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोल्हापूरच्या राष्ट्रीय परिषदेत साप्ताहिक गंगाधर आणि कोल्हापूर साहित्य परिषदेतर्फे हा पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक विजय जोशी, संमेलनाचे संयोजक कमलाकर वर्टेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सचिव प्राचार्य डॉ. दीप्ती देशपांडे, संस्थेचे अध्यक्ष आर. पी. देशपांडे, शैलेश गोसावी, विभागीय सचिव प्राचार्य डॉ. राम कुलकर्णी, संस्थेचे कुलसचिव गिरीश नातू आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

गुलमोहरनगरातील बारबाबत महिलांचा एल्गार

इंदिरानगर । वार्ताहर

पाथर्डी परिसरातील रॉयल रेस्टो बारचा परवाना रद्द करण्यासंदर्भात प्रशासनाने त्वरित कारवाई करावी, अशी मागणी गुलमोहरनगर येथील महिलांनी केली आहे. तसे न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

यासंदर्भात रहिवाशांनी बार मालकाशी तीन दिवसांपूर्वी चर्चा केली आहे. बारमध्ये येणाऱ्या ग्राहकांच्या गाड्या या गुलमोहरनगर कॉलनीच्या प्रवेशद्वारासमोरच पार्क केल्या जातात. याचा महिला व तरुणवर्ग, ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या ठिकाणी सकाळपासून येणारे ग्राहक गाडीच्या काचा उघड्या ठेवून अश्लील हावभाव करणे, सिगारेट पिणे, शिवीगाळ करणे, तसेच वाहनाजवळ लघुशंका करणे असे प्रकार सातत्याने घडत आहेत. हा बार रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याने गैरव्यवसाय चालत आहेत. बार बंद न झाल्यास अनोख्या पद्धतीने आंदोलन छेडण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या श्रुती नाईक आणि त्यांच्या सहकारी महिलांनी दिला आहे.

अन्यथा आंदोलन करू

संबंधित बारमुळे परिसरातील शांतता धोक्यात आली आहे. मद्यपानामुळे अनेक रहिवाशांना त्रास होत आहे. बारचा परवाना रद्द करावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल.

■ श्रुती नाईक, सामाजिक कार्यकर्ती.

सिंहस्थासाठी तपोवनातील जागा अधिग्रहणावर मंगळवारी मुंबईत बैठक

नाशिक । प्रतिनिधी

आगामी सिंहस्थासंदर्भात तपोवन परिसरातील जागा अधिग्रहणाचा प्रश्न ऐरणीवर आला असून, संत-महंतांचे आखाडे आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या सेवेकऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या जागांची सोडवणूक करण्यासाठी मंगळवारी मुंबईत मंत्रालयात महत्त्वाची बैठक होणार आहे.

ही बैठक राज्याचे प्रधान सचिव अश्विनी भिडे यांच्या दालनात होणार आहे. अधिग्रहण प्रक्रियेतील प्रत्यक्ष अडचणी, मोबदल्याचे स्वरूप आणि निधीची आवश्यकता यावर सखोल चर्चा केली जाणार आहे.

सिंहस्थ २०२७ मध्ये होत आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक महापालिका व राज्य शासनाने नियोजन सुरू केले आहे. तपोवन हे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्वाचे क्षेत्र असल्याने तेथे आखाड्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पूर्वीच्या नोटिफाईड जागांचे अद्याप अधिग्रहण बाकी असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी लागणार आहे. या जागा फक्त दोन वर्षांसाठी भाडेतत्त्वावर घ्याव्यात की थेट अधिग्रहीत कराव्यात, यावरदेखील निर्णय घेतला जाणार आहे. मोबदल्यासाठी टीडीआर (ट्रान्स्फरेबल डेव्हलपमेंट राईट्स) देण्याचा पर्याय विचाराधीन असून, त्याची टक्केवारी निश्चित केली जाणार आहे. काही जागांमध्ये ५० टक्के भूविकास करून जागा मालकांना परत देणे यासारखे पर्यायदेखील बैठकीत मांडले जाणार आहेत.

तपोवन परिसरातील जागा हा सिंहस्थाच्या नियोजनातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. जागेच्या मोबदल्याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट झाल्यास पुढील टप्प्यातील अधिग्रहण प्रक्रिया गती घेईल. त्यामुळे मंगळवारची ही बैठक जागा अधिग्रहणाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनातील सूत्रांकडून सांगण्यात आले.